हिज मास्टर्स व्हाइस

१८८४ मध्ये ब्रिसॉल, इंग्लंड येथे मार्क बरॉड याच्या घरी एक कुत्र्याचे गोजिरवाणे पिलू जन्मले. घरी येणाऱ्या पाहुण्यांच्या पोटरीचा ते हलकासा चावा घेत असे. म्हणून मार्कनं त्याचं नाव निपर असं ठेवलं. पुढे १८८७ मध्ये जवळजवळ कंगाल अवस्थेत मार्क मरण पावला व निपरला घेऊन त्याचा लहान भाऊ चित्रकार फ्रान्सिस लिव्हरपूलला आला. निपर जसा मोठा होऊ लागला तसा अधिक



दांडगाई करू लागला. इतर कुत्र्यांबरोबर मारामाऱ्या, उंदीर व इतर पक्ष्यांचा पाठलाग हे त्याचे आवडीचे खेळ! अधूनमधून मार्कच्या आवाजातलं सिलिंडर ग्रोमोफोनवरचं ध्वनिमुद्रित गाणं फ्रान्सिस लावत असे. अशा वेळी मात्र आवाज ऐकताच निपर शहाण्यासारखा धावत येई व कर्ण्यातून येणारा आपल्या मालकाचा आवाज ऐकत बसे. हे अनेक वेळा घडल्याने त्याची एक पक्की प्रतिमा चित्रकार फ्रान्सिस बॅरॉन्डच्या डोक्यात ठसली व त्याने तसं एक पेंटिंग बनवलं.

१८९५ मध्ये वयाच्या अकराव्या वर्षी निपर मरण पावला व १८९८ मध्ये फ्रान्सिसने आपले पुन्हा नव्याने बनवलेलं पेंटिंग "Dog looking at and listening to phonograph" या नावाने रजिस्टर केलं. या चित्रात सिलिंडर फोनोग्राफ व त्याला जोडलेला काळा कर्णा व समोर बसलेला सफेद कुत्रा असं रंगवलं होते. त्याने सिलिंडर फोनोग्राफ बनवणाऱ्या एडिसन- बेल कंपनीत जाऊन हे चित्र दाखवलं व विकत घ्यायची गळ घातली. पण 'आमचे फोनोग्राफ्स कुत्री ऐकत नाहीत, माणसाकरिता आहेत', असं सांगून त्याला वाटेला लावलं गेलं. रॉयल ॲकेडमीचे प्रदर्शन किंवा मासिकात छापण्याकरिताही त्याने प्रयत्न केले. पण 'कुत्रा फोनोग्राफसमोर बसून काय करतोय हे कुणालाच कळणार नाही', असं सांगून ते नाकारलं गेलं.

कुणाच्या तरी सल्ल्यावरून फ्रान्सिसने चित्रातला कर्णा सोनेरीही रंगात रंगवून 'हिज् मास्टर्स व्हाइस' असं नाव पेंटिंगला दिलं व १८९९ मध्ये नव्यानेच स्थापन झालेल्या ग्रामोफोन कंपनीच्या मॅनेजर बॅरी ओवेनला दाखवलं. मॅनेजरने ते चित्र विकत घ्यायची तयारी दाखवली, पण कुत्र्यासमोर आमचा ग्रामोफोन व पितळी कर्णा दाखवण्याची सूचना केली.

कंपनीची मशिन्स घेऊन फ्रान्सिस घरी आला. सप्टेंबर १८९९ मध्ये हे नवीन चित्र ग्रामोफोन कंपनीतर्फे पन्नास पौंडांना खरेदी करण्यात आलं व कॉपीराईटचे आणखी पन्नास पौंड देऊन रीतसर करारपत्र फ्रान्सिस बरॉडबरोबर करण्यात आलं. कंपनीच्या १९०० सालातील जाहिरातींमध्ये 'हिज मास्टर्स व्हॉइस' या नावाचा व पेंटिंगचा प्रथम वापर करण्यात आला तर १९०७ मध्ये लेटरहेडवर उपयोग सुरू होऊन १९१० मध्ये रीतसर 'ट्रेडमार्क'ची नोंदणी झाली. तेव्हापासून ग्रामोफोन कंपनी व एच. एम. व्ही. ही नावं गाजू लागली. फ्रान्सिस बरॉड १९२४ मध्ये मरण पावला. तोवर ग्रामोफोन कंपनीने त्याच्याकडून २४ आणखी पेंटिंग्ज बनवून घेतली. पुढे बॅरी ओवेनने अमेरिका व जपान इथून मागणी आल्यामुळे त्या विभागातले या ट्रेडमार्कचे हक्क त्यांना विकले. ग्रामोफोन रेकॉर्ड्स, मशिन्स, पिनांच्या डब्या, रेकॉर्ड कव्हर्स, साफ करायचे ब्रश, सर्वत्र हा ट्रेडमार्क दिसायला लागला.

तोवर विविध रेकॉर्ड कंपन्यांच्या लेबलवरती गरुड, हेरॉन, बुलबुल यांसारखे पक्षी किंवा प्राणी वा नक्षीदार वेलबुट्टी असे ग्रामोफोन व झोनोफोनच्या लेबलवरती खाचा पाडणारा पंखवाला मुलगा 'देवदूत' दिसे. आपल्याकडे १९१५ च्या सुमारास त्या चित्राची जागा 'डॉग अँड हॉर्न' या एच. एम. व्ही. ट्रेडमार्कने घेतली व या चित्राने गेली जवळजवळ ८०/९० वर्षे कंपनीचं जगभर प्रतिनिधित्व केलं. मूळ चित्र आता इएमआयच्या लंडन येथील वस्तुसंग्रहालयात ठेवलं असून बारकाईने योग्य प्रकाशात बघता ग्रामोफोन मशीनच्या खाली पूर्वीचं सिलिंडर मशीनही दिसतं. या निपरच्या व पेंटिंगच्या प्रेमात शेकडो मंडळी जगभर पसरलेली आहेत व यासंबंधीत सर्व वस्तूंचा संग्रह करणारे संग्राहक व त्यांच्या संस्था/ सोसायट्या जगभर विखुरलेल्या आहेत. १९८४ मध्ये या एकाच विषयाला वाहिलेलं कलेक्टर्स गाईड प्रकाशित करण्यात आलं व १९९७ साली त्याची सुधारित आवृत्तीपण काढण्यात आली. एका सामान्य कुत्र्याच्या चित्राबरोबर कंपनीचं भाग्य उजळून निघालं व शतक समाप्तीच्या वेळी विसाव्या शतकातील प्रसिद्ध १० ब्रॅंडसमध्ये त्याचा समावेश झाला.

■ सुरेश चांदवणकर
sschand@fif5.res.ir